|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

उमवि नगर, जळगाव ४२५००१ फोन 0257-2257276, 2257277 फोन 0257-2258403, 406,
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : 0257-2257276 to 2257277, Fax Nos.:0257-2258403, 406
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

जा.क्र. कबचौ उमवि/१८/ 551 /२०२३ अत्यंत महत्वाचे दिनांक : ०२/०६/२०२३

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी,
संलग्नीत अनुदानित महाविद्यालयांचे मा.प्राचार्य यांना

विषय - अनुदानित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापकांची पदे भरणे बाबत अनुसरावयाची कार्यपध्दती बाबत.

संदर्भ - १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दि. ११ एप्रिल, २०२२
२. विद्यापीठाचे जा.क्र. कबचौउमवि/१३/६०/२०२२ दि.१९.०४.२०२२ रोजीचे परिपत्रक

महोदय/महोदया,

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ नुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/ संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी त्यांच्या दि.११ एप्रिल, २०२२ चा शासननिर्णय निर्गमित केला असून सदर शासननिर्णय विद्यापीठाशी संलग्नीत अनुदानित महाविद्यालयांना यापूर्वीच विद्यापीठाच्या संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये पाठविण्यात आला आहे.

ज्या अनुदानित महाविद्यालयांना शिक्षक संवार्गातील पदे भरणेबाबत शासनाने नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे, सदर नाहरकत प्रमाणपत्राच्या अधिन राहून विद्यापीठाने अश्या महाविद्यालयांना जाहिरात प्रसिध्द करण्यास मंजुरी दिली आहे, आणि त्यानुसार महाविद्यालयांने जाहिराती प्रसिध्द केल्या आहेत. ज्या महाविद्यालयांनी पदे भरणे बाबत निवड समितीची मागणी केली आहे अशा महाविद्यालयांना निवड समिती देखील विद्यापीठाने दिली आहे.

शिक्षकीय पदे भरतांना उपरोक्त सदर्भीय शासन निर्णयातील पान क्र. ०४ वर उदाहरण दाखल विषयनिहाय व प्रवर्गाची गुणवत्ता यादी कशी असावी या बाबत सविस्तर दर्शविण्यात आले आहे. महाविद्यालयांनी पदे भरतांना सदर नमून्यानूसारच तक्ता विद्यापीठास सादर करावा (उमेदवारांच्या नावा सह) सदर तक्त्यावर संस्थेचे चेअरमन/अध्यक्ष, महाविद्यालयाचे प्राचार्य, मा.कुलगुरुचे प्रतिनिधी व मागसवर्गीस प्रतिनिधी यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. (एका पेक्षा जास्त तक्ते असल्यास प्रत्येक तक्त्यावर सही असणे आवश्यक आहे)

तसेच सदर शासन निर्णयातील पान क्र.०५ वर दर्शविण्यात आलेल्या गुणवत्ता यादी नुसार प्रवर्गानिहाय अंतिम यादी देखील (उमेदवारांच्या नावा सह) तयार करुन संस्थेचे चेअरमन/अध्यक्ष, महाविद्यालयाचे प्राचार्य, मा.कुलगुरुचे प्रतिनिधी व मागसवर्गीस प्रतिनिधी यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

वर नमुद केलेले तक्ते सादर केल्या शिवाय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी व विद्यापीठास सहकार्य करावे, हि विंनती.

आपला विश्वासू

उपकुलसचिव
(व्याख्याता मान्यता विभाग)

प्रत माहितीसाठी : मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि,जळगाव